# विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती

**२०१५-२०१६**

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या सन २००७-०८ च्या विशेष अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीवरील अनुपालन अहवाल.....

## आठवा अहवाल

(हा अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक ..... एप्रिल, २०१६ रोजी सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
एप्रिल, २०१६

# विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या सन २००७-०८ च्या विशेष अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीवरील अनुपालन अहवाल....

## आठवा अहवाल

## विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती
## (२०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१) श्री. बाळासाहेब सानप, वि.स.स.

**सदस्य**

२) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

३) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

४) श्री. विजय रहांगडाले, वि.स.स.

५) श्री. महेश चौघुले, वि.स.स.

६) डॉ. तुषार राठोड, वि.स.स.

७) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

८) श्री. सुरेश धानोरकर, वि.स.स.

९) श्री. कुणाल पाटील, वि.स.स.

१०) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.

११) श्री. भाऊसाहेब पाटील-चिकटगांवकर, वि.स.स.

१२) श्री. महादेव जानकर, वि.प.स.

१३) श्री. रामराव वडकुते, वि.प.स.

१४) श्री. राजेंद्र जैन, वि.प.स.

१५) श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव,
(३) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव,
(४) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी

---

सन २०१५-२०१६ या वर्षाकरीता मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा व मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी अनुक्रमे दिनांक १ मे. २०१५ व दिनांक २१ मे. २०१५ रोजी विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती नामनिर्देशित केली आहे.

# विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती
## (२००७-२००८)

**समिती प्रमुख :**

१) श्री. पद्माकर वळवी, वि.स.स.

**सदस्य :**

२) श्री. आनंदराव गेडाम, वि.स.स.

३) श्री. राजू आवळे, वि.स.स.

४) श्री. बबनराव घोलप, वि.स.स.

५) श्री. केशवराव आंधळे, वि.स.स.

६) श्रीमती उषाताई दराडे, वि.प.स.

७) श्री. जगदीश गुप्ता, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव,

(२) श्री. बी.एन. बागुल, उप सचिव,

(३) श्री.डी.एम. गवळी, समिती अधिकारी.

# अनुक्रमणिका



| अ.क्र. (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
| --- | --- | --- |
| १. | प्रस्तावना | .. |
| २. | अहवाल | .. |
| ३. | परिशिष्ट "एक" (सन २००७-०८ च्या विशेष अहवातील शिफार्शींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती.) | .. |
| ४. | परिशिष्ट "दोन" (आदिवासी विकास विभागाकडून साक्षीच्यावेळी प्राप्त झालेली माहिती) | .. |
| ५. | परिशिष्ट "तीन" (समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त) | .. |

## प्रस्तावना

मी, विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने दिलेल्या अधिकारानुसार समितीच्या "विशेष अहवालातील" (सन २००७-२००८) शिफारशींवर शासनाने केलेल्या कारवाईच्या संदर्भात अनुपालन अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

सन २००५-२००७ या वर्षासाठी गठीत झालेल्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांच्या सेवेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांसंदर्भात दिनांक ३० सप्टेंबर २००६ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन तेथील संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्याआधारे तत्कालिन समितीने दिनांक १० जुलै, २००७ रोजी विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. त्या अनुषंगाने तत्कालीन समितीतर्फे दोन्ही सभागृहास दिनांक १ ऑगस्ट, २००७ विशेष अहवाल सादर करण्यात आला होता.

सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत केलेल्या समितीने विशेष अहवालातील शिफारशींवर विभागाने केलेल्या कार्यवाहीची छाननी केली व त्यानुषंगाने या समितीने दिनांक ८ सप्टेंबर, २०१५ रोजी विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. विभागाने पुरविलेल्या लेखी माहिती व विभागीय प्रतिनिधींच्या साक्षींच्या आधारे मिळालेल्या सर्व माहितीचा साकल्याने विचार करून त्यासंदर्भातील आपले अभिप्राय या अहवालात नमूद केले आहेत. उरलेल्या शिफारशींबाबत समितीला कोणतेही अभिप्राय व्यक्त करावयाचे नाहीत.

अनुपालन अहवालातील परिशिष्ट "एक" व "दोन" मध्ये आदिवासी विकास विभागाकडून प्राप्त झालेली माहिती तसेच परिशिष्ट "तीन" मध्ये समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त समाविष्ट करण्यात आले आहे. समितीने दिनांक ५ एप्रिल, २०१६ रोजी प्रारूप अहवालावर विचार करून तो संमत केला.

प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभग, सचिव, सामान्य प्रशासन विभग आणि अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांच्या कार्यालयातील संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्यावेळी समिती समोर उपस्थित राहून समितीला आवश्यक ती माहिती देऊन सहकार्य केल्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

**विधान भवन, मुंबई**
दिनांक : ५ एप्रिल, २०१६

**बाळासाहेब सानप**
समिती प्रमुख
विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती.

# अहवाल

## आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक

(१) समितीच्या सन २००७ च्या विशेष अहवालातील शिफारस क्रमांक ३ मध्ये, "अपर आयुक्त व निवड समितीने भरती प्रक्रिया अंमलात आणताना सन २००० सालच्या आरक्षण पदांना गृहित धरुन व सन २००५ ची शासनमान्य नविन पदे समाविष्ट करुन अंदाजे आरक्षण निश्चित केले व भरतीची कार्यवाही केली. आरक्षण व रोष्टर तपासणीचे काम सहाय्यक आयुक्त (महसुल विभाग) नाशिक यांचे असताना सर्व अधिकार अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी स्वत: वापरुन आरक्षण निश्चित केले. त्यामुळे समिती शिफारस करीत आहे की, बिंदू नामावली व्यतिरिक्त कोणतीही भरती होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच बिंदू नामावलीची नोंदवही ठेवणारे अधिकारी तसेच कार्यालय प्रमुख यांची योग्य ती चौकशी करुन खुलासा घेऊन कारवाई करण्यात यावी व नियमानुसार प्रतिवर्षी बिंदू नामावलीची तपासणी करुन घेण्यात यावी. यासंबंधी केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत देण्यात यावी",अशी शिफारस केली होती. समितीच्या उक्त शिफारशीवर आदिवासी विकास विभागाने खालील प्रमाणे लेखी माहिती दिली :-

"दिनांक ३० जुलै २००२ रोजी सहाय्यक आयुक्त (महसुल विभाग) नाशिक यांचेकडून बिंदू नामावली (रोष्टर) तपासून घेण्यात आली आहे.

सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. बसीपी-२००४/१६६६/प्रक्र ६१/०४/१६-ब दिनांक १० ऑगस्ट २००४ या मधील मार्गदर्शन सुचनेनुसार मा.आयुक्त आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे आदेश क्र.प्रशा/आस्था-२००६ प्रक्र. ५८/का-२ (२) दिनांक ३१ ऑक्टोबर २००६ नुसार निर्देशित केले आहे की, मोठया शासकिय कार्यालयामध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन केल्याने मागासवर्गीयांना आरक्षण विषयक लाभ व सवलती मिळण्यास सुलभ व्हावे म्हणून वर्ग-३ संवर्गातील कर्मचाऱ्यांचे आरक्षण तपासण्याकरीता अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचे स्तरावर मागासवर्ग कक्षासाठी समिती गठीत केली असल्याने त्यानुसार आरक्षण बिंदू नामावली तयार करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे व त्यानुसार भरतीबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे. मात्र मा.विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने सूचित केल्यानुसार अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे कार्यालयातील आरक्षण बिंदू नामावली (रोष्टर) तपासणी सहाय्यक आयुक्त (महसूल विभाग), नाशिक यांचेकडून दिनांक १० एप्रिल, २००७ रोजी करुन घेण्यात आलेली आहे व त्यानुसार सरळसेवा व पदोन्नतीची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

समितीने, यासंदर्भात दिनांक ८ सप्टेंबर, २०१५ रोजी घेतलेल्या साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी समितीस विदित केले की, सन २००७ पर्यंतची बिंदू नामावली अद्ययावत करून घेतली आहे. सन २००७ पर्यंतची तपासलेली बिंदू नामावली व पुढील बिंदू नामावली पडताळून समिती समोर एका महिनाभराच्या अवधीमध्ये सादर केली जाईल. बिंदू नामावली व त्या अद्ययावत करण्याबाबत विभाग प्रमुख म्हणून विभागाच्या आयुक्तालयास तसेच संबंधीत कार्यालयांना तशा प्रकारे सूचना निर्गमित केल्या आहेत. आदिवासी विकास आयुक्तालयात, अपर आयुक्तांच्या स्तरावर मागासवर्गासाठी समिती स्थापन केली असून त्यानुसार आरक्षण बिंदू नामावली तयार करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. दिनांक ३० सप्टेंबर, २००६ रोजी अपर आयुक्तांनी सदर बाब तपासून नियमानुसार व बिंदू नामावलीनुसार पद भरती करण्यात यावी असे प्रशासकीय आदेश दिले होते. संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी लावल्यानंतर चौकशीअंती ज्या बाबी सिध्द होतील, त्याप्रमाणे त्यांच्यावर चार्जेस लावण्यात येतील. त्यानुसार नियमानुसार योग्य ती शिक्षा त्यांना करण्यात येईल.

यावर समितीने, कोणत्याही शासकीय कार्यालयातील बिंदू नामावली (रोस्टर) नियमितपणे दर दोन वर्षांनी अद्ययावत करणे आवश्यक आहे. आदिवासी विकास आयुक्तालयाने सन २००७ पर्यंतचीच बिंदू नामावली अद्ययावत करून घेतली आहे. त्यापुढील बिंदू नामावली तपासणी करून घेतलेली नाही. **हे लक्षात घेता यापुढे बिंदूनामावली नियमितपणे तपासण्याची दक्षता शासनाने घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(२) अहवालातील शिफारस क्रमांक ५ मध्ये असे नमुद केले होते की, दिनांक ३० सप्टेंबर, २००६ रोजी तत्कालीन अपर आयुक्त यांनी समितीसमोर येऊन साक्ष देण्यास नकार दिला होता. तथापि त्यांनी इतर अधिकाऱ्यांच्या सांगण्यानुसार साक्ष दिली. त्यांनी समितीला असमाधानकारक माहिती दिली. याबाबी समितीचा पर्यायाने सभागृहाचा अवमान करणाऱ्या आहेत. समिती विशेषाधिकारभंगाच्या आयुधाचा वापर करण्याची टोकाची भूमिका घेऊ इच्छित नाही. मात्र प्रशासनाचे प्रमुख म्हणून मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या विचारार्थ व चौकशीसाठी हे प्रकरण देऊ इच्छिते. या प्रकरणात त्यांनी समितीच्या भावना, संविधानातील तरतूदी, विशेषाधिकारभंगाबाबत समितीची भूमिका लक्षात घेवून अत्यंत न्यायोचित भूमिका घेऊन अशा प्रकरणाची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा. समितीच्या उक्त शिफारशीवर आदिवासी विकास विभागाने पुढील प्रमाणे लेखी माहिती दिली :-

"श्री. हिंगोणेकर दिनांक ११ जून, २००७ ते २० जून, २००८ या कालावधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक या पदावर कार्यरत होते. समितीच्या साक्षीनंतर श्री.हिंगोणेकर यांची बदली करण्यात येऊन त्यांच्या

जागी दिनांक २१ जून, २००८ ते दिनांक १७ जून, २०१० या कालावधीकरीता श्री.प्रकाश महाजन या भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांची सदर पदावर नियुक्ती करण्यात आलेली होती."

याबाबत साक्षीच्या वेळी विभागीय प्रतिनिधींनी समितीस विदित केले की, यासंदर्भात चौकशी अधिकाऱ्याची नेमणूक केलेली आहे. संबंधीत अधिकाऱ्यांवर विभागीय चौकशी चालू करण्याची प्रक्रीया सुरू केली आहे. सदरचा अहवाल सादर करण्यासंदर्भात विभागाकडून दिरंगाई झालेली आहे हे खरे आहे.

यावर समितीने, असे मत व्यक्त केले की सन २००७-०८ च्या अहवालाच्या मुद्यांच्या अनुषंगाने आपण त्यांच्याविरुध्द आता चौकशीच्या कार्यवाहीस सुरूवात केली आहे. ज्यावेळी तत्कालीन समितीने भेट दिली त्यावेळी अपर आयुक्त तथा निवड समितीचे अध्यक्ष श्री.खाडे होते. ते स्वत: त्यांच्या मर्जीने समितीपुढे न येता इतर अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार साक्षीस आले. **गत समितीच्या सूचने प्रमाणे कार्यवाही करण्यास शासनाने केलेल्या दिरंगाईची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(३) अहवालातील शिफारस क्रमांक ६ मध्ये असे नमूद केले होते की, तत्कालीन अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी भरती करतांना अनियमितता आणि नियमबाहय बाबी केल्याचे निष्पन्न झाल्याने या अपर आयुक्त कार्यालयात तसेच आदिवासी विकास विभागातील अन्य भरतीबाबत एक सुयोग्य अशी कार्यपध्दती विकसित करावी जेणेकरुन गैरमार्गाने भर्ती करण्यास वाव मिळणार नाही व आवश्यकता भासल्यास अन्य विभागात भरती प्रक्रियेसाठी ज्याप्रमाणे समिती स्थापन करण्यात येते त्या धर्तीवर सुयोग्य अशी समिती स्थापन करावी अथवा महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ व सहकार विभागाने स्वीकार केलेल्या सक्षम अशा खाजगी एजन्सीकडून किंवा महाराष्ट्र ज्ञान मंडळाकडून (MKCL) मार्फत भरतीची प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी अशी समितीने शिफारस केली होती.

समितीच्या उक्त शिफारशीवर आदिवासी विकास विभागाने खालील प्रमाणे लेखी माहिती दिली :-

"या विभागातंर्गत रिक्त असलेली वर्ग-३ संवर्गातील सरळसेवेची पदे भरण्यासाठी संपूर्ण भरती प्रक्रिया महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) यांचेमार्फत करण्यात येत आहे.

" यासंदर्भात दिनांक ८ सप्टेंबर, २०१५ रोजी झालेल्या साक्षीच्या वेळी विभागीय प्रतिनिधींनी समितीस माहिती दिली की, भरती प्रक्रियेत अनियमितता व नियमबाह्य बाबी झाल्याचे आढळून आल्यानंतर त्यापुढील भरती प्रक्रिया एम.के.सी.एल. मार्फत करण्यात आलेली आहे. काही शासकीय विभागांनी भरती प्रक्रिया एम.के.सी.एल. किंवा परीक्षा मंडळ यांच्यामार्फत करावी असे आदेश काढण्यात आले होते. फक्त एम.के.सी.एल.मार्फतच भरती करावी

असे आदेश देण्यात आलेले नव्हते. आदिवासी विकास विभागाने आता राज्य शासनाच्या परीक्षा मंडळाकडून शिक्षकांची भरती प्रक्रिया सुरू केलेली आहे.

(४) अहवालातील शिफारस क्रमांक ७ मध्ये असे नमूद केले आहे की, भरतीसाठी मागविण्यात आलेल्या अर्जांपैकी अपात्र ठरवितांना कोणते निकष वापरले याची माहिती समितीस वेळीच उपलब्ध न करणे, दिशाभूल करणारी माहिती देणे या बाबी विशेषाधिकार भंगाच्या ठरतात. भविष्यात अशा स्वरुपाची पुनरावृत्ती होऊ नये याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी.

समितींच्या उक्त शिफारशीवर विभागाने "याबाबत दक्षता घेण्यात आली आहे" असे लेखी माहितीद्वारे कळविले आहे. यासंदर्भात साक्षीच्या वेळी समितीने उक्त शिफारशीवरील कारवाईची माहिती वेळीच उपलब्ध करून देण्यात आलेली नाही, याबाबत आता कोणती दक्षता घेण्यात येत आहे, असा प्रश्न केला असता प्रधान सचिवांनी विदित केले की, त्यावेळी एम.के.सी.एल.कडून भरती प्रक्रिया करण्यात येत होती. **आता राज्य शासनाच्या परीक्षा मंडळाकडून भरती प्रक्रिया करण्यात येत आहे. त्यावेळी अपर आयुक्तांना जे अधिकार होते ते कमी करण्यात आले आहेत. आता परीक्षा मंडळाकडून परीक्षा घेत असताना ऑनलाईन अर्ज मागविण्यात येतात.** भरती प्रक्रिया पूर्ण झाल्यावर फक्त निवड यादी विभागाकडे सादर करण्यात येते. विभागाकडून फक्त उमेदवारांना ऑर्डर देण्याचे काम करण्यात येते त्यामुळे भरतीमध्ये पारदर्शकता आलेली आहे.

विशेष अहवालातील उक्त दोन्ही शिफारशीवर विभागीय सचिवांनी दिनांक ८ सप्टेंबर, २०१५ रोजी घेतलेल्या साक्षीच्यावेळी दिलेल्या माहितीवरुन समितीचे समाधान झाले.

(५) विशेष अहवालातील शिफारस क्रमांक १३ मध्ये समितीने असे निदेश दिले होते की, श्री.खाडे अपर आयुक्त, नाशिक हे समितीचे अध्यक्ष होते व सध्याचे अपर आयुक्त, श्री.हिंगोणेकर त्यावेळी उपायुक्त व निवड समितीचे सदस्य सचिव होते. श्री.हिंगोणेकर यांनी दिनांक १९ जून, २००७ व दिनांक १० जून, २००७ रोजी झालेल्या साक्षीच्या वेळी भरतीबाबतची सर्व माहिती तत्कालीन अपर आयुक्तांनाच होती असे सांगितले. त्यामुळे श्री.हिंगोणेकर समितीपासून काही माहिती लपवित असल्याचे समितीचे मत झाले. तत्कालीन अपर आयुक्त श्री.खाडे यांचेबरोबर सध्या कार्यरत असलेले अपर आयुक्त श्री.हिंगोणेकर हे आपली जबाबदारी टाळीत आहेत व समितीची दिशाभूल करीत आहेत. या सर्व बाबी विचारात घेता श्री.हिंगोणेकर यांच्या अपर आयुक्त पदावर केलेल्या नियुक्तीबाबत पुर्नविचार करावा व एक सक्षम प्रशासकीय अधिकारी त्यांच्या जागी नियुक्ती करावा. तसेच भविष्यात करावयाच्या चौकशीच्या वेळी निवड समितीचे सदस्य सचिव या नात्याने श्री. हिंगोणेकर यांना बोलविण्यात यावे व त्यांची चौकशी करावी.

समितीच्या उक्त शिफारशीवर आदिवासी विकास विभागाने खालीलप्रमाणे लेखी माहिती पुरविली :-

" श्री.हिंगोणेकर दि.११ जून, २००७ ते दि.२० जून, २००८ या कालावधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक या पदावर कार्यरत होते. समितीच्या साक्षीनंतर श्री.हिंगोणेकर यांची बदली करण्यात येऊन त्यांच्या जागी दि.२१/०६/२००८ ते दि.१७/०६/२०१० या कालावधीकरीता श्री.प्रकाश महाजन या भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांची सदर पदावर नियुक्ती करण्यात आलेली होती. सद्यस्थितीत श्री.हिगोणेकर हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.

यासंदर्भात दिनांक ८ सप्टेंबर, २०१५ रोजी झालेल्या साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांबरोबर चर्चा करताना सचिवांनी समितीस विदित केले की, या संबंधी चौकशी अधिकाऱ्याची नेमणूक केलेली आहे. तत्कालिन अप्पर आयुक्त श्री.हिंगोणेकर यांच्या विरुध्द विभागीय चौकशी चालू करण्याबाबतची प्रक्रिया व त्यांच्या विरोधात चार्जेस लावण्याची प्रक्रिया चालू आहे. सन २००७-२००८ च्या बैठकीनंतर काही काळ ते प्रत्यक्ष त्या विभागामध्ये काम करीत होते, ,त्यामुळे त्यांच्या विरुध्द होणाऱ्या विभागीय चौकशीवर त्याचा परिणाम होऊ शकत होता. म्हणून त्यावेळी त्यांच्यासंदर्भातील चौकशीला विलंब लागला.

समितीने, यावर वसुली व दंडात्मक कारवाईपोटी कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात येईल अशी विचारणा केली असता प्रधान सचिवांनी, विभागीय चौकशी पूर्ण झाल्यानंतर श्री.हिगोणेकर यांच्या पेन्शनमधून दहा टक्के रक्कम व आवश्यकतेप्रमाणे त्यापेक्षा जास्त रक्कम वसूल करण्याची तरतूद आहे. तसेच, त्यांच्या प्रॉपर्टीवर वसूली पूर्ण होईपर्यंत जप्ती आणण्याचीही तरतूद संबंधित कायद्यामध्ये आहे. विभागीय चौकशीनंतर दंडात्मक कारवाई व वसूली यासारख्या दंड आकारणीची कार्यवाही करण्यात येईल. श्री.हिंगोणेकर यांना आता सेवानिवृत्तीनंतर केवळ भविष्य निर्वाह निधीचे प्रदान करण्यात आलेले आहे. त्यांच्या पगारातून त्यांनी केलेल्या अपहाराची रक्कम नियमाप्रमाणे वसूल करण्याची कारवाईही करण्याचे विचाराधीन आहे. लवकरच त्यावर अंमलबजावणी करण्यात येईल असे विदित केले.

समितीने, यावर सन २००७-२००८ च्या बैठकीपासून संबंधित कार्यालयाने यासंदर्भातील सविस्तर व अद्ययावत माहिती समितीसमोर सादर करणे अपेक्षित होते, असे असतानाही सन २०१५ मध्ये देखील समितीसमोर ही माहिती सादर केली गेलेली नाही. याबाबत विभागीय प्रतिनिधींकडे विचारणा केली असता प्रधान सचिवांनी खुलासा केला की, सन २००७ मध्ये याबाबत पुन्हा माननीय मुख्य सचिवांनी चौकशी पूर्ण करण्याबाबत निदेश दिले होते. आयुक्त कार्यालय नाशिक यांच्याकडून याबाबत शासनाकडे माहिती देण्याबाबत दिरंगाई झालेली आहे. चौकशीअंती संबंधित अधिकाऱ्यांसमवेत इतर जे कोणी दोषी असतील त्यांच्याविरुध्द

देखील कारवाई करण्यात येईल. अपर आयुक्त, आदिवासी विकास यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे, यामध्ये भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांचा देखील समावेश होतो. नियमानुसार विभागीय चौकशी सुरू करण्यात आलेली आहे.

यावर समितीने, श्री.खाडे, तत्कालिन अपर आयुक्त, नाशिक हे निवड समितीचे अध्यक्ष होते व श्री.हिंगोणेकर त्यावेळी उपायुक्त व निवड समितीचे सदस्य होते. म्हणजेच श्री.खाडे व श्री. हिंगोणेकर हे दोघे ही विधानमंडळाच्या त्यावेळेच्या समितीने (सन २००७-०८) दिलेल्या भेटीच्या वेळी आदिवासी विकास आयुक्तालयात कार्यरत होते. तत्कालिन समितीने दिनांक १ ऑगस्ट २००७ मध्ये सभागृहात अहवाल सादर करून उक्त दोन्ही अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची शिफारस केली होती.

साक्षीच्यावेळी समितीच्या निदर्शनास आले की, तत्कालिन (सन २००६) अपर आयुक्त व निवड समितीचे अध्यक्ष श्री.खाडे यांच्यावर त्यांनी समिती समोर साक्षीसाठी येण्यास नकार देऊनही तसेच नियमबाह्यता व अनियमितता करूनही त्यांच्यावर कोणतीही कारवाई प्रस्तावित केलेली नाही. **आयुक्त आदिवासी विकास आयुक्तालयातील एकूणच भरतीमध्ये झालेली अनियमितता, बिंदू नामावली, भरतीसाठी देण्यात येणाऱ्या जाहिराती तसेच शिक्षक भरती, या सर्व प्रकरणाबाबत शासनाने केलेल्या कारवाईची माहिती समितीस एक महिन्यात सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

******

# परिशिष्ट - "एक"

(सन २००७-०८ च्या विशेष अहवातील शिफार्शींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती.)

महाराष्ट्र शासन

# *अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक विभाग, नाशिक*

**आदिवासी विकास भवन, तळ मजला, गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.**

**दुरध्वनी क्रमांक (०२५३)२५७५८१६,२५७७०४५,२५७८५६८** **फॅक्स (०२५३) २५७८५६८**

---

क्रमांक आस्था-२००७/प्र.क्र. १०/का.१(२)/ १५७७

नाशिक
दिनांक :-०२ ऑक्टोबर, २०१०

प्रति
कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
मंत्रालय, मुंबई-३२

विषय :- विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या विशेष अहवालातील (२००७-०८) शिफारसींवर शासनाने केलेल्या कार्यवाही संबंधीची माहिती

संदर्भ :- आपले पत्र क्र-मविरा-विजाभजकस/ड-५ दि ८/९/२०१०.

महोदय,

वरील विषयी संदर्भाकिंत पत्रान्वये मागणी केलेली माहिती यापुर्वीच पत्र क्र-आस्था-२००७/प्रक्र १०/का-१(२)/ दि. १६/९/२००८ अन्वये मा. आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राजय, नाशिक यांचेमार्फत मा. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना सादर केलेली आहे.

करीता सदर पत्राची छायांकित प्रत पुनश्च यापत्रासोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

स्थळ प्रतीवर मा अपर आयुक्त,
यांची सही आहे

अपर आयुक्त,
आदिवासी विकास, नाशिक करीता

प्रत :- मा आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर

क्रं.आस्था.२००७/प्र.क्र.१०/का.१(२)
अपर आयुक्त, आदिवासी विकास,
नाशिक विभाग,नाशिक
दिनांक : ऑगष्ट २००८
१६।८।०८

प्रति,

मा.सचिव,
आदिवासी विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई

(मार्फत : मा.आयुक्त, आदिवासी विकास, म.राज्य, नाशिक)

**विषय : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या विशेष अहवालातील (सन २००७-२००८) शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाही संबंधीचे विवरण पाठविणेबाबत.**

संदर्भ : महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडील पत्र क्रं.९५०८४/ म.वि.स./ड-४, दिनांक ८ जुलै २००८

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे कार्यलयातील विमुक्त जाती व भटक्या जमाती अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबतचा विशेष अहवालातील शिफारशींवर केलेल्या कार्यवाही संबंधीचे विवरण यासोबत पाठविण्यात येत आहे. ही विनंती.

आपला विश्वासू

(स्वाक्षरी)
अपर आयुक्त
आदिवासी विकास, नाशिक

प्रत : १) मा.आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
२) विभागीय आयुक्त, (महसुल विभाग, नाशिक) नाशिक
३) विभागीय आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, नाशिक विभाग, नाशिक

१८।९।०८
आवक विभाग
आदिवासी विकास आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, नाशिक

१८।९।०८

## विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती
## २००७-०८ विशेष अहवालावरील शिफारशींवर केलेल्या कार्यवाहीचे विवरण

| क्रं. | शिफारस | खुलासा |
|---|---|---|
| १. | अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या कार्यालयात विमुक्त जाती व भटक्या जमातीचा १०७ पदांचा सरळसेवेचा अनुशेष असल्याने समिती अशी शिफारस करीत आहे की, सर्वसाधारण शिक्षण व आश्रमशाळेतील शिक्षण तसेच आश्रमशाळेतील अन्य आवश्यक पदांबाबत शिवाय दुर्गम भागातील शैक्षणिक विकासासाठी सरळ सेवेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीचा अनुशेष तात्काळ भरण्यात यावा. तसेच या भरतीसंबंधी विभागाच प्रतिनिधींनी वेळोवेळी नमूद केलेल्याअडचणी सुयोग्य पध्दतीने सोडविण्यासाठी तातडीने मार्ग काढून ही सर्व पदे विनाविलंब भरण्यात यावीत, याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिण्याच्या आत देण्यात यावा. | अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक या कार्यालयातील विमुक्त जाती व भटक्या जामतीच्या सरळसेवेचा अनुशेष भरुन काढणेची कार्यवाही सुरु आहे.<br>प्राथमिक शिक्षकाची विमुक्त जाती व भटक्या जमातीची अनुशेषाची ३१ पदे भरणेकामी पात्र उमेदवारांची कागदपत्रांची तपासणी करुन सदर उमेदवारांची अध्यापन पदविकेतील गुणानुक्रमे निवड यादी तयार करुन त्यानुसार नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.<br>तसेच गृहपाल (पुरुष), गृहपाल (स्त्री), अधिक्षक (पुरुष), अधिक्षक (स्त्री), माध्यमिक शिक्षकाची अनुशेषाची ५० पदे भरणेकामी उमेदवारांची लेखी परिक्षा घेण्यात आली आहे. लेखी परिक्षेचा निकाल प्राप्त झाला आहे. तोंडी मुलाखतीचा दिनांक निश्चित करुन पुढील कार्यवाही तातडीने करण्यात येत आहे. |
| २. | विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गात अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या कार्यालयात वर्ग - ३ पदाच्या पदोन्नतीत ४० % अनुशेष असल्याने सदर अनुशेष भरुन काढण्यासाठी शासन स्तरावर तातडीने कारवाई करावी. त्याबाबत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना तातडीने आदेश द्यावेत अशी समितीची आग्रही शिफारस आहे. | विमुक्त जाती व भटक्या जमातीची पदोन्नतीची पदे भरणेकामी मा.उच्च न्यायालयात याचिका क्रं.८४५२/२००४ अन्वये विमुक्त जाती व भटक्या जमातीची पदोन्नतीची पदे भरण्यास स्थगिती होती. त्यामुळे त्यावेळी सदरची पदे भरता आलेली नाही. शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग क्रं.बीसीसी-२००१/१८८/ प्र.क्र.६४/०१/१६-ब, दि.१/४/०८ अन्वये विमुक्त जाती व भटया जमाती प्रवर्गाची पदोन्नतीचे पदे उपरोक्त मुळ याचिका क्रं. ८४५२/२००४ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून भरणेबाबत कळविले आहे. त्यानुसार पदोन्नतीस पात्र कर्मचाऱ्यांच्या जेष्ठता तयार करुन पदोन्नती समितीची बैठक घेऊन पदोन्नती आदेश निर्गमित करण्यांत येत आहे. |
| ३. | अपर आयुक्त व निवड समितीने भरती प्रक्रिया अंमलात आणताना २००० सालच्या आरक्षण पदांना गृहीत धरुन व २००५ ची शासनमान्य नवीन पदे समाविष्ठ करुन अंदाजे आरक्षण निश्चित केले व भरतीची कार्यवाही केली. आरक्षण व रोस्टर तपासणीचे काम सहाय्यक आयुक्त (महसुल विभाग) नाशिक यांचे असतांना सर्व अधिकार अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी स्वत: वापरुन आरक्षण निश्चित केले. त्यामुळे समिती शिफारस करीत आहे की, बिंदू नामावली व्यतिरिक्त कोणतीही भरती होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच बिंदू नामावलीची नोंदवही ठेवणारे अधिकारी तसेच कार्यालय प्रमुख यांची योग्य ती चौकशी करुन खुलासा घेऊन कारवाई करण्यात यावी व नियमानुसार प्रतिवर्षी बिंदू नामावलीची तपासणी करुन घेण्यात यावी. यासंबंधी केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिण्याच्या आत देण्यात यावी | दिनाक ३०/७/२००२ रोजी सहाय्यक आयुक्त (महसूल विभाग) नाशिक यांचेकडून आरक्षण बिंदू नामावली (रोष्टर) तपासून घेण्यात आले आहे.<br>सामान्य प्रशासकीय विभाग परिपत्रक क्र.बीसीपी-२००४/१६६६/प्रक्र.६१/०४/१६-ब दि.१० ऑगस्ट,२००४ या मधील मार्गदर्शक सूचनेनुसार मा.आयुक्त,आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य,नाशिक याचे आदेश क्र.प्रशा/ आस्था-२००६/प्र.क्र.५८/का.२(२) दि.३१ ऑक्टोबर,२००६ नुसार निर्देशित केले आहे की, मोठया शासकीय कार्यालयामध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन केल्याने मागासवर्गीयांना आरक्षण विषयक लाभ व सवलती मिळण्यास सुलभ व्हावे म्हणून वर्ग-३ संवर्गातील कर्मचाऱ्याचे आरक्षण तपासण्याकरिता अपर आयुक्त,आदिवासी विकास यांचे स्तरावर मागासवर्ग कक्षासाठी समिती गठीत केली असल्याने त्यानुसार आरक्षण बिंदू नामावली तयार करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. व त्यानुसार भरती बाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे. मात्र मा.विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने सूचित केल्यानुसार अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे कार्यालयातील आरक्षण बिंदू नामावली (रोस्टर ) तपासणी सहाय्यक आयुक्त (महसुल विभाग), नाशिक यांचेकडून दिनांक १०/४/२००७ रोजी करुण घेण्यात आलेली आहे. व त्यानुसार सरळसेवा व पदोन्नतीची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. |

| | | |
|---|---|---|
| ४. | नव्याने भरती केलेल्या उमेदवाराकडून ३ महिण्यात जात पडताळणी प्रमाणपत्रे मागविण्यात येतात. मात्र एक वर्षापेक्षा अधिक काळापासूनही जात पडताळणी प्रमाणपत्र न दिलेले उमेदवार सेवेत असल्याचे समितीला आढळून आले. त्यामुळे समिती अशी शिफारस करीत आहे की, अनुसुचित जमातीच्या धर्तीवर अन्य राखीव पदांबाबत शक्य तेवढया लवकर जात पडताळणी प्रमाणपत्र घेण्यात यावे. अन्यथा नियमानुसार कारवाई करुन त्यांच्या नियुक्तीचे आदेश रद्द करण्यात यावेत. अवैध प्रमाणपत्र प्राप्त झाल्यास त्याबाबत कायद्यानुसार कारवाई करण्यासाठी संबंधीताकडे तसे प्रकरण तातडीने शिफारस करुन पाठविण्यात यावे. जेणेकरुन अवैध मार्गाने सेवाप्रवेश करणाऱ्या तत्वांना आळा बसू शकेल. यासंदर्भात ३ महिण्यात कारवाई करुन समितीला अहवाल सादर करण्यात यावा. | नव्याने भरती केलेल्या उमेदवारांकडून जात पडताळणी प्रमाणपत्र घेण्यात आले आहेत. तसेच भविष्यात नव्याने नियुक्त होणाऱ्या उमेदवारांकडून विहीत कालावधीत जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यात येईल. या कार्यालयाकडे अवैध प्रमाणपत्र प्राप्त झाल्याचे प्रकरण नाही. भविष्यात असे प्रकरण प्राप्त झाल्यास त्याबाबत कायद्यानुसार कारवाई करण्याची दक्षता घेण्यात येईल. |
| ५. | दिनांक ३०/९/२००६ रोजी तत्कालिन अपर आयुक्त यांनी समितीसमोर येऊन साक्ष देण्यास नकार दिला होता. तथापि त्यांनी इतर अधिकाऱ्यांच्या सांगण्यानुसार साक्ष दिली. तथापी, त्यांनी समितीला असमाधानकारक माहिती दिली. शिवाय मागणी केलेली माहिती देण्यास नकार दिला. याबाबी समितीचा पर्यायाने सभागृहाचा अवमान करणाऱ्याच्या आहेत. तथापी, समिती विशेषाधिकारभंगाच्या आयुधाचा वापर करण्याची टोकाची भुमिका घेऊ इच्छित नाही. मात्र प्रशासनाचे प्रमुख म्हणून मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या विचारार्थ व चौकशीसाठी हे प्रकरण देऊ इच्छिते. या प्रकरणात त्यांनी समितीच्या भावना संविधानातील तरतुदी विशेषाधिकारभंगाबाबत समितीची भूमिका लक्षात घेऊन अत्यंत न्यायोचित भूमिका घेऊन अशा प्रकरणाची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस ३ महिण्यात सादर करावा. | सदर बाब शासन स्तरावरील आहे. |
| ६. | तत्कालीन अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी भरती करतांना अनियमितता आणि नियमबाहय बाबी केल्याचे निष्पन्न झाल्याने या अपर आयुक्त कार्यालयात तसेच आदिवासी विकास विभागातील अन्य भरतीबाबत एक सुयोग्य अशी कार्यपध्दती विकसीत करावी, जेणेकरुन गैरमार्गाने भरती करण्यास वाव मिळणार नाही व आवश्यकता भासल्या अन्य विभागात भरती प्रक्रियेसाठी ज्याप्रमाणे समिती स्थापन करण्यात येते त्या धर्तीवर सुयाग्य अशी समिती स्थापन करावी अथवा महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ व सहकार विभागाने स्विकार केलेल्या सक्षम अशा खाजगी एजन्सीकडून किंवा महाराष्ट्र ज्ञान मंडळाकडून (MKCL) मार्फत भरतीची प्रक्रिया पुर्ण करण्यात यावी ही समिती शिफारस करीत आहे. | या विभागांतर्गत रिक्त असलेली वर्ग-३ संवर्गातील सरळ सेवेची पदे भरण्यासाठी संपूर्ण भरती प्रक्रिया महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, ( MKCL) याचे मार्फत करण्यांत येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| ७. | भरतीसाठी मागविण्यात आलेल्या अर्जांपैकी अपात्र ठरवितांना कोणते निकष वापरले याची माहिती समितीच वेळीच उपलब्ध न करणे, दिशाभूल करणारी माहिती देणे या बाबी - विशेषाधिकार भंगाच्या ठरतात. **भविष्यात अशा स्वरुपाची पुनरावृत्ती होऊ नये याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी.** | याबाबत दक्षता घेण्यात येत आहे. |
| ८. | अपर आयुक्त, नाशिक कार्यालयाने डिसेंबर २००५ मध्ये जाहिरात देऊन केलेली भरती प्रक्रिया दोषपुणे असल्याने या संपुर्ण प्रकरणाची चौकशी एका वेगळ्या यंत्रणेमार्फत करण्यात यावी. तसेच हे काम केवळ सी.आय.डी. सारखीच यंत्रणा करु शकते याचाही विचार व्हावा. | सदर बाब शासन स्तरावरील आहे. |
| ९. | प्राथमिक शिक्षकांची १६५ रिक्त पदे भरण्याबाबत शासनाकडून मार्गदर्शन केले जाऊनही ती न भरण्याबाबत अपर आयुक्त यांनी दिलेल्या उत्तराशी समिती सहमत नसल्याने समिती शासनास अशी शिफारस करीत आहे की, अपर आयुक्तांकडून मागविण्यात आलेले सर्व प्रकारचे मार्गदर्शन पुर्ण करुन यातील सर्व अडचणी दुर करुन तातडीने सर्व शिक्षक भरती करण्यात यावी. व त्यासंबधीचा अहवाल एक महिण्याच्या आत समितीला देण्यात यावा. ग्रामीण, दुर्गम भातील आदिवासी विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान टाळावे | प्राथमिक शिक्षक संवर्गाची पदे भरणेकामी १३३ उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यांत आले आहेत.<br>विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून आता (MKCL) मार्फत भरती प्रक्रिया करुन उमेदवारांनी नियुक्ती पत्र देण्यात आले आहेत. |
| १०. | लेखी व तोंडी गुण देताना काही उमेदवारांवर अन्याय करणाऱ्या बाबी निदर्शनास आल्याने याबाबत सखोल चौकशी करणे आवश्यक आहे. ही बाब देखील चौकशी समितीकडे सोपविण्यात यावी. | सदर बाब शासन स्तरावरील आहे. |
| ११. | भविष्यात शिक्षकांची भरती करतांना नियमानुसार आवश्यक असलेली प्रतिक्षा यादी बंधनकारक ठेवावी. | याबाबत दक्षता घेण्यात आली आहे. |
| १२. | भरती प्रक्रियेबाबत अपर आयुक्तांनी समितीला माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे निष्पन्न झाल्याचे सिध्द होते. अत: समिती अशी शिफारस करीत आहे की, ही बाब जरी प्रथमदर्शनी हक्कभंगाची ठरत असली तरी समितीने अथवा सभागृहाने याची दखल घेण्याऐवजी प्रशासनाचे प्रमुख म्हणून मुख्य सचिवांनी याची दखल घ्यावी व संबंधितावर सक्त स्वरुपाची कारवाई करावी. | सदर बाब शासन स्तरावरील आहे. |
| १३. | श्री.खाडे, अपर आयुक्त, नाशिक हे समितीचे अध्यक्ष होते व सध्याचे अपर आयुक्त, श्री.हिंगोणेकर त्यावेळी उपायुक्त व निवड समितीचे सदस्य सचिव होते. श्री. हिंगोणेकर यांनी दिनांक १९/६/२००७ व दिनां क १०/७/२००७ रोजी झालेल्या साक्षीच्या वेळी भरतीबाबतची सर्व माहिती तात्कालिन अपर आयुक्तांनाच होती असे सांगितले. त्यामुहे श्री. हिंगोणेकर समितीपासून काही माहिती लपवित असलेचे समितीचे मत झाले. तत्कालिन अपर आयुक्त, श्री.खाडे यांच्याबरोबर सध्या कार्यरत असलेले अपर आयुक्त, श्री.हिंगोणेकर हे आपली जबाबदारी टाळीत आहेत व समितीची दिशाभूल करीत आहेत. या सर्व बाबी विचारात घेता श्री.हिंगोणेकर यांच्या अपर आयुक्त पदावर केलेल्या नियुक्तीबाबत पुनर्विचार करावा व एक सक्षम प्रशासकीय अधिकारी त्यांच्या जागी नियुक्त करावा. तसेच भविष्यात करावाच्या चौकशीच्या वेळी निवड समितीचे सदस्य सचिव या नात्याने श्री. हिंगोणेकर यांना बोलवण्यात यावे व त्यांची चौकशी करावी. | सदर बाब शासन स्तरावरील आहे.<br>शासनाकडून श्री.हिंगोणेकर यांची अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक या पदावरुन बदली करण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| १४. | उपरोक्त भरतीसाठी लेखी परीक्षा घेण्यात आली. त्यासाठी प्रश्नपत्रिका कोणी तयार केल्या, नमुना उत्तरपत्रिका कोणी तयार केल्या, नमुना उत्तरपत्रिका बरोबर होत्या का याची तपासणी केलेली नव्हती. उत्तरपत्रिका तपासणारांची नावे समितीला दिली गेली नाहीत. तसेच उत्तरपत्रिका तपासण्याचा कार्यकाल किती होता, किती शिक्षक व मुख्याध्यापकांची नेमणुक करण्यात आली होती याची माहिती समितीला मिळू शकली नाही. सबब, अशी दोषपुर्ण उत्तरपत्रिका तपासणाऱ्यांना आरक्षित प्रवर्गाची तसेच खुल्या प्रवर्गाची फसवणूक टाळण्यासाठी हे सर्व काम वर उल्लेख केल्याप्रमाणे एक वेगळ्या यंत्रणेमार्फत करण्यात यावे. | महाराष्ट्र ज्ञान मंडळ ( MKCL) यांचेकडून काम करुन घेण्यात येत आहे. |
| १५. | नियुक्तीचे आदेश देतांना अपर आयुक्त कार्यालयाने नियुक्त केलेल्या उमेदवारांनी केव्हा हजर व्हावे याबाबतचा स्पष्ट उल्लेख आदेशात केलेला नव्हता. शिक्षकांना नियुक्तीसाठी पावणेदोन महिने पर्यंतचा कालावधी लागला. काही शिक्षक हजरच झाले नाहीत. मात्र त्यांच्या नियुक्तीचे आदेश रद्द केले नाहीत. सबब आदिवासी विकास विभागाने तसेच सामान्य प्रशासन विभागाने सक्त आदेश काढून अशा प्रकारच्या नियुक्त्या भविष्यात देण्यात येणार नाहीत यासाठी कठोर कारवाई करावी. तसेच ज्यांनी दोषपुर्ण आदेश काढले त्यांच्यावर सक्त कारवाई करण्यात यावी व केलेली कार्यवाही समितीला ३ महिण्यात कळविण्यात यावी. | नियुक्ती आदेशात केव्हा हजर व्हावे याबाबत स्पष्ट उल्लेख करण्यांत येत असून भविष्यातही त्यानुसार कार्यवाही करण्यांत येईल. |

अपर आयुक्त
आदिवासी विकास, नाशिक

# परिशिष्ट - "दोन"

(आदिवासी विकास विभागाकडून साक्षीच्यावेळी
प्राप्त झालेली माहिती)

# विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीची साक्ष बैठक मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष

## दिनांक ०९ सप्टेंबर २०१५

| अ.क्र. | शिफारस | खुलासा | सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| १. | अपर आयुक्त आदिवासी विकास, नाशिक यांच्या कार्यालयात विमुक्त जाती व भटक्या जमातीचा १०७ पदांचा सरळसेवेचा अनुशेष असल्याने समिती अशी शिफारस करीत आहे की, सर्वसाधारण शिक्षण व आश्रमशाळेतील शिक्षण तसेच आश्रमशाळेतील अन्य आवश्यक पदांबाबत शिवाय दुर्गम भागातील शैक्षणिक विकासासाठी सरळ सेवेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीचा अनुशेष तात्काळ भरण्यात यावा. तसेच या भरतीसंबंधी विभागाचे प्रतिनिधींनी वेळोवेळी नमूद केलेल्या अडचणी सुयोग्य पध्दतीने सोडविण्यासाठी तातडीने मार्ग काढून ही सर्व पदे विनाविलंब भरण्यात यावीत, याबाबत केलेल्या कार्यवाहीचा असलवा समितीचा तीन महिन्याच्या आत देण्यात यावा. | अपर आयुक्त आदिवासी विकास नाशिक या कार्यालयातील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या सरळसेवेचा अनुशेष भरुन काढणेची कार्यवाही सुरु आहे.<br>प्राथमिक शिक्षकांची विमुक्त जाती व भटक्या जमातीची अनुशेषाची ३१ पदे भरणेकामी पात्र उमेदवारांची कागदपत्रांची तपासणी करुन सदर उमेदवारांची अध्यापन पदविकेतील गुणानुक्रमे निवड यादी तयार करुन त्यानुसार नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.<br>तसेच गृहपाल (पुरुष) गृहपाल (स्त्री) अधिक्षक (पुरुष) अधिक्षक (स्त्री) माध्यमिक शिक्षकांची अनुशेषाची ५० पदे भरणेकामी उमेदवारांची लेखी परिक्षा घेण्यात आली आहे. लेखी परिक्षेचा निकाल प्राप्त झाला आहे. तोंडी मुलाखतीचा दिनांक निश्चित करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. | गुणानुक्रमे व कागदपत्र पडताळणीनंतर पात्र ठरलेल्या उमेदवारांना प्राथमिक शिक्षक-३१ व गृहपाल (पुरुष) गृहपाल (स्त्री) अधिक्षक (पुरुष) व अधिक्षक (स्त्री) ५० अशी एकूण ८१ उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले असून, सद्यस्थितीत कर्मचारी कार्यरत आहेत. |
| २. | विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गात अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या कार्यालयात वर्ग-३ पदांच्या पदोन्नतीत ४० % अनुशेष असल्याने सदर अनुशेष भरुन काढण्यासाठी शासन स्तरावर तातडीने कारवाई करावी. त्याबाबत अपर आयुक्त आदिवासी विकास, नाशिक यांना तातडीने आदेश द्यावेत अशी समितीची आग्रही शिफारस आहे | विमुक्त जाती व भटक्या जमातीची पदोन्नतीची पदे भरणेकामी मा. उच्च न्यायालयात याचिका क्र-८४५९/२००४ अन्वये विमुक्त जाती व भटक्या जमातीची पदोन्नतीची पदे भरण्यास स्थगिती होती. त्यामुळे त्यावेळी सदरची पदे भरता आलेली नाही. शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग क्र-बीसीसी-२००१/१८८/प्रक्र ६४/०१/१६-ब दिनांक ०१/०४/२००८ अन्वये विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाची पदोन्नतीचे पदे उपरोक्त मुळ याचिका क्र-८४५२/२००४ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून भरणेबाबत कळविले आहे. त्यानुसार पदोन्नतीस पात्र कर्मचाऱ्यांच्या ज्येष्ठता तयार करुन पदोन्नती समितीची बैठक घेऊन पदोन्नती आदेश निर्गमित करण्यात येत आहे. | मुळ याचिका क्र-८४५२/२००४ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून भरणेबाबत कळविले आहे. त्यानुसार पदोन्नतीस पात्र कर्मचाऱ्यांच्या ज्येष्ठता तयार करुन पदोन्नती समितीची बैठक घेऊन पदोन्नती आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.<br>वर्ग-४ संवर्गातून कनिष्ठ लिपीक पदी पदोन्नती दिलेले भज-ड-१, कनिष्ठ लिपीकांमधून वरिष्ठ लिपीक पदी पदोन्नती दिलेले विजा-अ-१, भ.ज.-ब-२, भ.ज.-क-१ एकूण-४ वरिष्ठ लिपीकांमधून उपलेखापाल पदी पदोन्नती- भ.ज.-ब-१ तर आदिवासी विकास निरिक्षकांमधून कार्यालय अधिक्षक पदी भ.ज.-क-१ अशा कर्मचाऱ्यांना सन २००८ व सन २००९ मध्ये पदोन्नत्या देण्यात आलेल्या आहेत. |

| अ.क्र. | शिफारस | खुलासा | सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| ३. | अपर आयुक्त व निवड समितीने भरती प्रक्रिया अंमलात आणतांना २००० सालच्या आरक्षण पदांना गृहित धरुन व २००५ ची शासनमान्य नविन पदे समाविष्ट करुन अंदाजे आरक्षण निश्चित केले व भरतीची कार्यवाही केली. आरक्षण व रोष्टर तपासणीचे काम सहाय्यक आयुक्त (महसुल विभाग) नाशिक यांचे असतांना सर्व अधिकार अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी स्वत: वापरुन आरक्षण निश्चित केले . त्यामुळे समिती शिफारस करीत आहे की, बिंदु नामावली व्यतिरिक्त कोणतीही भरती होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच बिंदु नामावलीची नोंदवही ठेवणारे अधिकारी तसेच कार्यालय प्रमुख यांची योग्य ती चौकशी करुन खुलासा घेऊन कारवाई करण्यात यावी व नियमानुसार प्रतिवर्षी बिंदु नामावलीची तपासणी करुन घेण्यात यावी. यासंबंधी केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत देण्यात यावी. | दिनांक ३०/०७/२००२ रोजी सहाय्यक आयुक्त (महसुल विभाग) नाशिक यांचेकडून बिंदु नामावली (रोष्टर) तपासून घेण्यात आले आहे.<br>सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र-बसीपी-२००४/१६६६/प्रक्र ६१/०४/१६-ब दिनांक १० ऑगस्ट २००४ या मधील मार्गदर्शक सुचनेनुसार मा. आयुक्त आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे आदेश क्र-प्रशा/आस्था-२००६/प्रक्र ५८/का-२ (२)/ दिनांक ३१ ऑक्टोबर २००६ नुसार निर्देशित केले आहे की, मोठया शासकीय कार्यालयांमध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन केल्याने मागासवर्गीयांना आरक्षण विषयक लाभ व सवलती मिळण्यास सुलभ व्हावे म्हणून वर्ग-३ संवर्गातील कर्मचाऱ्यांचे आरक्षण तपासण्याकरीता अपर आयुक्त आदिवासी विकास यांचे स्तरावर मागासवर्ग कक्षासाठी समिती गठीत केली असल्याने त्यानुसार आरक्षण बिंदु नामावली तयार करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे व त्यानुसार भरतीबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे. मात्र मा. विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने सूचित केल्यानुसार अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे कार्यालयातील आरक्षण बिंदु नामावली (रोष्टर) तपासणी सहाय्यक आयुक्त (महसुल विभाग), नाशिक यांचेकडून दिनांक १०/०४/२००७ रोजी करुन घेण्यात आलेली आहे व त्यानुसार सरळसेवा व पदोन्नतीची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. | सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र-बसीपी-२००४/१६६६/प्रक्र ६१/०४/१६-ब दिनांक १० ऑगस्ट २००४ या मधील मार्गदर्शक सुचनेनुसार मा. आयुक्त आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे आदेश क्र-प्रशा/आस्था-२००६/प्रक्र ५८/का-२ (२)/ दिनांक ३१ ऑक्टोबर २००६ नुसार निर्देशित केले आहे की, मोठया शासकीय कार्यालयांमध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन केल्याने मागासवर्गीयांना आरक्षण विषयक लाभ व सवलती मिळण्यास सुलभ व्हावे म्हणून वर्ग-३ संवर्गातील कर्मचाऱ्यांचे आरक्षण तपासण्याकरीता अपर आयुक्त आदिवासी विकास यांचे स्तरावर मागासवर्ग कक्षासाठी समिती गठीत केली असल्याने त्यानुसार आरक्षण बिंदु नामावली तयार करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे व त्यानुसार भरतीबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे. मात्र मा. विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने सूचित केल्यानुसार अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे कार्यालयातील आरक्षण बिंदु नामावली (रोष्टर) तपासणी सहाय्यक आयुक्त (महसुल विभाग), नाशिक यांचेकडून दिनांक १०/०४/२००७ रोजी करुन घेण्यात आलेली आहे . त्यानुसार सरळसेवेची व पदोन्नतीची पदे भरण्यात आली आहे. |

| अ.क्र. | शिफारस | खुलासा | सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| ४. | नव्याने भरती केलेल्या उमेदवारांकडून तीन महिन्यात जात पडताळणी प्रमाणपत्र मागविण्यात येतात. मात्र एक वर्षापेक्षा अधिक काळापासूनहीजात पडताळणी प्रमाणपत्र न दिलेले उमेदवारे सेवेत असल्याचे समितीला आढळून आले. त्यामुळे समिती अशी शिफारस करीत आहे की, अनुसूचित जमातीच्या धर्तीवर अन्य राखीव पदांबाबत शक्य तेवढया लवकर जात पडताळणी प्रमाणपत्र घेण्यात यावे. अन्यथा नियमानुसार कारवोई करुन त्यांच्या नियुक्तीचे आदेश रद्द करण्यात यावेत. अवैध प्रमाणपत्र प्राप्त झाल्यास त्याबाबत कायद्यानुसार कारवाई करण्यासाठी संबंधीताकडे तसे प्रकरण तातडीने शिफारस करुन पाठविण्यात यावे. जेणेकरुन अवैध मार्गाने सेवाप्रवेश करणाऱ्या तत्वांना आळा बसू शकेल. यासंदर्भात तीन महिन्यात कारवाई करुन समितीला अहवाल सादर करण्यात यावा. | नव्याने भरती केलेल्या उमेदवारांकडून जात पडताळणी प्रमाणपत्र घेण्यात आले आहेत. तसेच भविष्यात नव्याने नियुक्त होणाऱ्या उमेदवारांकडून विहित कालावधीत जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यात येईल. या कार्यालयाकडे अवैध प्रमाणपत्र प्राप्त झाल्याचे प्रकरण नाही. भविष्यात असे प्रकरण प्राप्त झाल्यास त्याबाबत कायद्यानुसार कारवाई करण्याची दक्षता घेण्यात येईल. | शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र-बीसीसी-२०११/प्रक्र १०६४/२०११/१६-ब दिनांक १२ डिसेंबर २०११ नुसार नव्याने नियुक्ती दिलेल्या मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्यांची मुदत देण्यात येते. तसेच विहित दिलेल्या मुदतीत नव्याने नियुक्ती दिलेल्या उमेदवारांकडून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यात येते. |
| ५. | दिनांक ३०/०९/२००६ रोजी तत्कालीन अपर आयुक्त यांनी समितीसमोर येऊन साक्ष देण्यास नकार दिला होता. तथापि त्यांनी इतर अधिकाऱ्यांच्या सांगण्यानुसार साक्ष दिली. तथापि त्यांनी समितीला असमाधानकारक माहिती दिली. शिवाय मागणी केलेली माहिती देण्यास नकार दिला. याबाबी समितीचा पर्यायाने सभागृहाचा अवमान करण्याऱ्याच्या आहेत. तथापि समिती विशेषधिकारभंगाच्या आयुधाचा वापर करण्याची टोकाची भूमिका घेऊ इच्छित नाही. मात्र प्रशासनाचे प्रमुख म्हणून मुख्य सचिव महाराष्ट्र शासन यांच्या विचारार्थ व चौकशीसाठी हे प्रकरण देऊ इच्छिते. या प्रकरणात त्यांनी समितीच्या भावना संविधानातील तरतूदीविशेषधिकारभंगाबाबत समितीची भूमिका लक्षात घेवून अत्यंत न्यायोचित भूमिका घेऊन अशा प्रकरणाची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा. | सदर बाब शासन स्तरावरील आहे. | सदर बाब शासन स्तरावरील आहे. |

| अ.क्र. | शिफारस | खुलासा | सद्यस्थिती |
| --- | --- | --- | --- |
| ६. | तत्कालीन अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी भरती करतांना अनियमितता आणि नियमबाहय बाबी केल्याचे निष्पन्न झाल्याने या अपर आयुक्त कार्यालयात तसेच आदिवासी विकास विभागातील *अन्य भरतीबाबत एक सुयोग्य अशी कार्यपध्दती विकीस करावी, जेणेकरुन गैरमार्गाने भरती करण्यास वाव मिळणार नाही व आवश्यकता भासल्यास अन्य विभागात भरती प्रक्रियेसाठी ज्याप्रमाणे समिती स्थापन करण्यात येते त्या धर्तीवर सुयोग्य अशी समिती स्थापन करावी अथवा महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ व सहकार विभागाने स्विकार केलेल्या सक्षम अशा खाजगी एजन्सीकडून किंवा महाराष्ट्र ज्ञान मंडळाकडून (MKCL) मार्फत भरतीची प्रक्रिया पुर्ण करण्यात यावी ही समिती शिफारस करीत आहे | या विभागातंर्गत रिक्त असलेली वर्ग-३ संवर्गातील सरळसेवेची पदे भरण्यासाठी संपुर्ण भरती प्रक्रिया महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) यांचेमार्फत करण्यात येत आहे. | सदर भरती प्रक्रिया महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) यांचे मार्फत पुर्ण करण्यात आली आहे. |
| ७. | भरतीसाठी मागविण्यात आलेल्या अर्जापैकी अपात्र ठरवितांना कोणते निकष वापरले याची माहिती समितीचे वेळीच उपलब्ध न करणे, दिशाभूल करणारी माहिती देणे या बाबी विशेषाधिकार भंगाच्या ठरतात. भविष्यात अशा स्वरुपाची पुनावृत्ती होऊ नये याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी. | याबाबत दक्षता घेण्यात येत आहे. | याबाबत दक्षता घेण्यात आली आहे. |
| ८. | अपर आयुक्त, नाशिक कार्यालयाने डिसेंबर २००५ मध्ये जाहिरात देऊन केलेली भरती प्रक्रिया दोषपुर्ण असल्याने या संपुर्ण प्रकरणाची चौकशी एका वेगळ्या यंत्रणेमार्फत करण्यात यावी. तसेच हे काम केवळ सी. आय.डी. सारखीच यंत्रणा करु शकते याचीही विचार व्हावा. | सदर बाब शासन स्तरावरील आहे. | याबाबत दक्षता घेण्यात आली आहे. |
| ९. | प्राथमिक शिक्षकांची १६५ रिक्त पदे भरण्याबाबत शासनाकडून मार्गदर्शन केले जाऊनही ती न भरण्याबाबत अपर आयुक्त यांनी दिलेल्या उत्तराशी समिती सहमत नसल्याने समिती शासनास अशी शिफारस करीत आहे की, अपर आयुक्तांकडून मागविण्यात आलेले सर्व प्रकारचे मार्गदर्शन पुर्ण करुन यातील सर्व अडचणी दुर करुन तातडीने सर्व शिक्षक भरती करण्यात यावी व त्यासंबंधीचा अहवाल एक महिन्याच्या आत समितीला देण्यात यावा. ग्रामीण दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान टाळावे | प्राथमिक शिक्षक संवर्गाची पदे भरणेकामी १३३ उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत.<br>विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून आता (MKCL) मार्फत भरती प्रक्रिया करुन उमेदवारांनी नियुक्ती पत्र देण्यात आले आहेत. | सदर भरती प्रक्रिया महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) यांचे मार्फत पुर्ण करण्यात आली आहे. |

| अ.क्र. | शिफारस | खुलासा | सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| १०. | लेखी व तोंडी गुण देतांना काही उमेदवारांवर अन्याय करणाऱ्या बाबी निदर्शनास आल्याने याबाबत सखोल चौकशी करणे आवश्यक आहे. ही बाब देखील चौकशी समितीकडे सोपविण्यात यावी. | सदर बाब शासन स्तरावरील आहे. | सदर बाब शासन स्तरावरील आहे. |
| ११. | भविष्यात शिक्षकांची भरती करतांना नियमानुसार आवश्यक असलेली प्रतिक्षा यादी बंधनकारक ठेवावी. | याबाबत दक्षता घेण्यात आली आहे. | याबाबत दक्षता घेण्यात येत आहे. |
| १२. | भरती प्रक्रियेबाबत अपर आयुक्तांनी समितीला माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे निष्पन्न झाल्याचे सिध्द होते. अत: समिती अशी शिफारस करीत आहे की, ही बाब जरी प्रथमदर्शनी हक्कभंगाची ठरत असली तरी समितीने अथवा सभागृहाने याची दखल घेण्याऐवजी प्रशासनाचे प्रमुख म्हणून मुख्य सचिवांनी याची दखल घ्यावी व संबंधीतांवर सक्त स्वरुपाची कारवाई करावी. | सदर बाब शासन स्तरावरील आहे. | सदर बाब शासन स्तरावरील आहे. |
| १३. | श्री. खाडे अपर आयुक्त नाशिक हे समितीचे अध्यक्ष होते व सध्याचे अपर आयुक्त, श्री. हिंगोणेकर त्यावेळी उपायुक्त व निवड समितीचे सदस्य सचिव होते. श्री. हिंगोणेकर यांनी दिनांक १९/०६/२००७ व दिनांक १०/०७/२००७ रोजी झालेल्या साक्षीच्या वेळी भरतीबाबतची सर्व माहिती तत्कालीन अपर आयुक्तांनाच होती असे सांगितले. त्यामुळे श्री. हिंगोणेकर समितीपासून काही माहिती लपवित असलेचे समितीचे मत झाले. तत्कालीन अपर आयुक्त श्री खाडे यांचे बरोबर सध्या कार्यरत असलेले अपर आयुक्त श्री. हिंगोणेकर हे आपली जबाबदारी टाळीत आहेत व समितीची दिशाभूल करीत आहेत. या सर्व बाबी विचारात घेता श्री. हिंगोणेकर यांच्या अपर आयुक्त पदावर केलेल्या नियुक्तीबाबत पुर्नविचार करावा व एक सक्षम प्राशासकीय अधिकारी त्यांच्या जागी नियुक्त करावा. तसेच भविष्यात करावयाच्या चौकशीच्या वेळी निवड समितीचे सदस्य सचिव या नात्याने श्री. हिंगोणेकर यांना बोलविण्यात यावे व त्यांची चौकशी करावी. | सदर बाब शासन स्तरावरील आहे. | सदर बाब शासन स्तरावरील आहे. |

# परिशिष्ट - "तीन"

(समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त)

पहिली बैठक

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीची बैठक, दिनांक ८ सप्टेंबर २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्मानीय सदस्य उपस्थित होते:-

**उपस्थिती :**

१) श्री. बाळासाहेब सानप, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

३) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

४) श्री. विजय रहांगडाले, वि.स.स.

५) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

६) श्री. सुरेश धानोरकर, वि.स.स.

७) श्री. महादेव जानकर, वि.प.स.

८) श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव,

(२) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

**विभागीय प्रतिनिधी :**

१. श्री. उज्वल ऊके, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग.

२. श्री. राजगोपाल देवरा, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग.

३. श्री. प्रमोद नलावडे, सचिव, सामान्य प्रशासन विभाग.

४. श्री. अशोक लोखंडे, अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक.

सदर बैठकीत समितीने सन २००७-०८ च्या विशेष अहवातील शिफार्शीवर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने प्रधान सचिव आदिवासी विकास विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, सचिव, सामान्य प्रशासन विभाग व संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

दुसरी बैठक

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक ५ एप्रिल, २०१६ रोजी विधान भवन मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती सदर बैठकीत खालील प्रमाणे सन्मानीय सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती :**

१) श्री. बाळासाहेब सानप, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

३) श्री. विजय रहांगडाले, वि.स.स.

४) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.

५) श्री. महादेव जानकर, वि.प.स.

६) श्री. रामराव वडकुते, वि.प.स.

७) श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव,

(३) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

समितीने प्रारूप अहवालावर विचार करून काही दुरूस्त्यांसह तो संमत केला.